# बृहन्मुंबई महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

**परिपत्रक**

क्र.एमओएम/१३० दि.२३.०४.२०२५

विषय:- २८ एप्रिल हा दिवस '' सेवा हक्क दिन'' म्हणून साजरा करण्याबाबत....

संदर्भ:- १. शासन निर्णय क्रमांक GAD/९४/२०२४-Lokshahidin दि.०१.०४.२०२५

२. क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.२७/मुसेहआ/कक्ष-२ दि.१७.०४.२०२५

उप सचिव, महाराष्ट्र शासन यांचा संदर्भाधीन क्र.१ वरील मा.महानगरपालिका आयुक्त यांना प्राप्त झालेला शासन निर्णय व सोबत जोडलेले राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे अर्ध शासकीय पत्र पहावे.

राज्यातील नागरिकांना दिल्या जाणा-या सेवा पारदर्शक, गतीमान व कालबद्ध पद्धतीने देण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ पारित करण्यात आला आहे. सदर अधिनियम दि.२८ एप्रिल,२०१५ रोजी अंमलात आला आहे. त्याअनुषंगाने राज्यामध्ये २८ एप्रिल हा दिवस ''सेवा हक्क दिन'' म्हणून साजरा करण्यास मान्यता प्राप्त झाली आहे.

तद्अनुषंगाने, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कार्यालयांमध्ये दि.२८ एप्रिल रोजी "सेवा हक्क दिन" खालीलप्रमाणे साजरा करण्यात यावा असे निदेश देण्यात येत आहेत.

१. सर्व खाते / विभाग प्रमुख यांनी प्रपत्र क मध्ये नमूद अनु. क्र.१ नुसार दि.२८.०४.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता त्यांच्या खाते/विभागातील संबंधित सर्व पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी व सर्व संबंधित कर्मचारी/अधिकारी यांना सोबत संलग्नित केलेल्या शपथेच्या नमुन्यानुसार सेवेची बांधिलकी मानणारी शपथ घ्यावी, अशा सूचना द्याव्यात.

२. सर्व २४ विभागीय सहायक आयुक्त व कार्यकारी आरोग्य अधिकारी , करनिर्धारक व संकलक, प्रमुख अभियंता (विकास नियोजन), प्रमुख अग्निशमन अधिकारी, प्रमुख अधिकारी (दुकाने व आस्थापना), जल अभियंता, उप आयुक्त (परि-०२) यांचे प्रशासकीय अधिकारी, उप प्रमुख अभियंता (रस्ते) नियोजन, उप प्रमुख अभियंता (वाहतूक), उद्यान अधीक्षक, अनुज्ञापन अधीक्षक यांनी सोबत जोडलेल्या प्रपत्र क मध्ये नमूद अनु. क्र. २, ४,८,१०,११ व १२ नुसार कार्यवाही करावी.

३. प्रमुख व्यवसाय विकास यांनी सोबत जोडलेल्या प्रपत्र क मध्ये नमूद अनु.क्र.३,५ व ६ नुसार कार्यवाही करावी.

| | | | |
|---|---|---|---|
| सही/-२२.०४.२०२५ | सही/-२२.०४.२०२५ | सही/-२२.०४.२०२५ | सही/-२२.०४.२०२५ |
| (शारदा गोसावी) | (किशोर गांधी) | (डॉ.अश्विनी जोशी) | (भूषण गगराणी) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सामान्य प्रशासन) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) | महानगरपालिका आयुक्त |

प्रकअ/१७३
२०२५-२६

सामान्य प्रशासन विभाग
क्र.एमओएम /१३० दि.२३.०४.२०२५

प्रत:-----------------------------------------------------------------------------------यांना

माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(लीना ता. शिंदे)
रचना व कार्यपध्दती अधिकारी(आयुक्त कार्यालय)

Scanned with ACE Scanner

२८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन"
म्हणून साजरा करण्याबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : GAD/९४/२०२४-Lokshahidin**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
**दिनांक :-०१ एप्रिल, २०२५**

**संदर्भ :** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५

**प्रस्तावना :-**

राज्यातील नागरिकांना दिल्या जाणा-या सेवा पारदर्शक, गतीमान व कालबध्द पध्दतीने देण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ पारित करण्यात आला आहे. सदर अधिनियम हा दि. २८ एप्रिल, २०१५ रोजी अंमलात आला आहे. त्यानुषंगाने राज्यामध्ये २८ एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यात २८ एप्रिल हा दिवस **"सेवा हक्क दिन"** म्हणून साजरा करण्याबाबत या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर दिवस साजरा करण्याबाबत कोणताही अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यात येणार नाही. सदर दिवस साजरा करण्यासाठी येणारा खर्च राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या तरतूदीमधून करण्यात यावा.

३. सेवा हक्क दिन साजरा करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालयाने निर्गमितं कराव्यात.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०४०११५३४५७८२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DILIP N
DESHPANDE

(दिलीप देशपांडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, मुंबई.
२. राज्य सेवा हक्क आयुक्त ( सर्व ), कोकण/पुणे/छत्रपती संभाजीनगर /अमरावती /नाशिक /नागपूर.

Scanned with ACE Scanner

प-१५

प्रत-

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.

२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

५. मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

६. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

७. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य.

८. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

९. मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

१०. सर्व मा.मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

११. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

१२. महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१३. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

१४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई, सी.बी.डी बेलापूर

१५. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

१६. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.

१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.

१८. सर्व विभागीय आयुक्त.

१९. सर्व जिल्हाधिकारी.

२०. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.

२१. मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख.

२२. निवड नस्ती (लोकशाही दिन कक्ष), सामान्य प्रशासन विभाग.

Scanned with ACE Scanner

प-७५

मनु कुमार श्रीवास्तव, भा.प्र.से. (से.नि.)
राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग
आपली सेवा आमचे कर्तव्य

अ.शा पत्र क्र. संकिर्ण-२०२५/प्र.क्र.२७/मुसेहआ/कक्ष-२
दि. १७ एप्रिल, २०२५

**विषय:- २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करणेबाबत.**

प्रिय भूषण,

शासनाने, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.GAD/९४/२०२४-Lokshahidin, दि.०१ एप्रिल, २०२५ (प्रत संलग्न) निर्गमित करून २८ एप्रिल हा दिवस "सेवा हक्क दिन" म्हणून साजरा करण्यास मान्यता दिली आहे. तसेच दि.२८ एप्रिल, २०२५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या अंमलबजावणीस दहा वर्ष पूर्ण होत आहेत. या दोन्ही बाबींचे औचित्य साधून राज्यातील महानगरपालिका/नगर परिषद क्षेत्रांमध्ये विविध उपक्रम राबवून हा दिवस जनसहभागासह साजरा करणे आवश्यक आहे.

त्यादृष्टीने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात नागरिकांमध्ये उक्त अधिनियमाबाबत, राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी दि.२८.०४.२०२५ रोजी "सेवा हक्क दिना" च्या निमित्ताने नागरी भागात विविध कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक असून अशा कार्यक्रमांचा उदाहरणादाखल तपशिल सोबत प्रपत्र-क मध्ये देण्यात आलेला आहे.

कृपया दि.२८.०४.२०२५ रोजी "सेवा हक्क दिन" साजरा करण्याकामी वरीलप्रमाणे प्रस्तावित कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याबाबत सर्व संबंधितांना आपल्या स्तरावरून सूचना द्याव्यात, ही विनंती.

आपला स्नेहांकित

(मनु कुमार श्रीवास्तव) १७/४/२०२५

प्रति,

डॉ. भूषण गगराणी,
आयुक्त,
बृहन्मुंबई महानगर पालिका,
मुंबई ४००००१

७ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दूरध्वनी: (०२२) २२०२२३४७ • ई-मेल: ccrts@maharashtra.gov.in

Scanned with ACE Scanner

प-१६

# प्रपत्र —क

| अ.क्र. | सेवा हक्क दिनाच्या निमित्ताने महानगरपालिका क्षेत्रामध्ये आयोजित करावयाचे कार्यक्रम |
|---|---|
| १ | दि.२८.०४.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिकेच्या सर्व पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय प्राधिकारी व सर्व संबंधित कर्मचारी/ अधिकारी यांनी सेवेची बांधिलकी मानणारी शपथ घेणे. (शपथेचा नमूना संलग्न) |
| २ | दि.२८.०४.२०२५ रोजी महानगरपालिकेच्या नागरी सुविधा केंद्रां (CFC) मार्फत नागरिकांना महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाबाबत व आपले सरकार पोर्टलबाबत अवगत करणे. तसेच सर्व ऑनलाईन अधिसूचित सेवा अशा नागरी सुविधा केंद्रातून देण्याची सुरुवात करणे. |
| ३ | महानगरपालिका क्षेत्रात गर्दीचे ठिकाणी जसे की, प्रभाग कार्यालय, पर्यटन स्थळे, तीर्थ स्थळे, महाविद्यालयीन परिसर इत्यादी ठिकाणी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ विषयी माहिती फलक (QR कोडसह) प्रदर्शित करणे. |
| ४ | प्रत्येक महानगरपालिका कार्यालयामध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत विहित सूचना फलक या पूर्वी लावले नसल्यास तसे माहिती फलक लावणे. (नमूना संलग्न) |
| ५ | प्रत्येक महानगरपालिका कार्यालयामध्ये अधिसूचित सेवांची व शुल्कांची माहिती देणारा QR CODE लावणे. |
| ६ | प्रत्येक महानगरपालिका कार्यालयामध्ये तक्रार नोंदवण्यासाठी QR CODE लावणे. |
| ७ | सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.आसेकें-१७२५/प्र.क्र.८६/मातं(३९), दि.२७ मार्च २०२५ अन्वये नवीन आपले सरकार सेवा केंद्रांचे उद्घाटन/ कार्यान्वयन करणे. |
| ८ | महानगरपालिका कार्यालयामध्ये नव्याने उभारावयाच्या नागरी सुविधा केंद्रांचे उद्घाटन/ कोनशिला समारंभ दि.२८.०४.२०२५ रोजी आयोजित करणे. |
| ९ | महानगरपालिका कार्यालयामध्ये नागरिकांना घरपोच सेवा देण्यासाठी "सेवादूत" योजना सुरू करणे. |
| १० | नागरी भागातील विद्यार्थी/ महिला/ इतर घटक यांचेशी सेवा हक्क कायद्याविषयी सुसंवाद साधून सदर कायद्याविषयी जनजागृती करण्याच्या दृष्टीने दि.२८.०४.२०२५ रोजी मेळाव्यांचे आयोजन करणे |
| ११ | नागरी भागातील शालेय/ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५, राज्य सेवा हक्क आयोग व आपले सरकार पोर्टल या संदर्भात दि.२८.०४.२०२५ रोजी निबंध स्पर्धा/वक्तृत्व स्पर्धा परिसंवाद इ. चे आयोजन करणे. |
| १२ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५च्या प्रचारासाठी नागरी भागात पथनाट्य, नाटके, गाणे, लोककलांचा वापर सुरू करणे. |

Scanned with ACE Scanner

प-17

## सेवा हक्क दिवसाच्या अनुषंगाने सर्व अधिकारी/ कर्मचारी यांनी घ्यावयाची शपथ

मी, गांभीर्यपुर्वक शपथ घेतो की

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015 अंतर्गत शासनाच्या सेवा पारदर्शक पध्दतीने विहीत कालमर्यादेत व सौजन्याने पात्र नागरिकांना देण्याकामी मला सुपुर्द करण्यात आलेली जबाबदारी पूर्ण प्रामाणिकतेने, निष्ठेने, सचोटीने, संवेदनशीलतेने व तत्परतेने पार पाडण्यासाठी मी कटिबध्द राहीन.

मी, सेवा वितरण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा विलंब, अडथळा किंवा भ्रष्टाचार होणार नाही यासाठी आवश्यक पावले उचलेन.

मी, उक्त कायद्याने नागरिकांना प्रदान केलेल्या सेवेच्या हक्काचा आदर ठेवून व नागरिकांविषयी सेवा भाव ठेवून त्यांच्या हितार्थ व कल्याणार्थ काम करेन.

Scanned with ACE Scanner